संत योगीराज विक्तूबाबा प्रतिष्ठान,
टाकळघाट, ता.हिंगणा, जि.नागपूर या
तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयांतील
कामांस प्रशासकीय व वित्तीय मान्यता
देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः तीर्थवि-२०१८/प्र.क्र.१९०/योजना-६,
बांधकाम भवन, २५ मर्झबान मार्ग,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक : ५ जुलै, २०१९.

वाचा :-

१) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा नागपूर यांचे पत्र क्रमांकः जिपना/बांध/का.२(२)/३४६५/२०१९,दिनांक ६ जून, २०१९ अन्वये सादर केलेला प्रस्ताव

२) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०१५/प्र.क.६/१४४४, दिनांक ४ जून २०१५.

३) शासन परिपत्रक क्रमांक : विकास -२०१७/प्र.क्र.२७२/योजना-६, दि. ३१ मार्च, २०१८.

४) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या दि. २१ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

५) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीचे दि. १७ जून, २०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

संत योगीराज विक्तूबाबा प्रतिष्ठान, टाकळघाट, ता.हिंगणा, जि.नागपूर या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयास निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित होते. त्यानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा नागपूर यांनी संत योगीराज विक्तूबाबा प्रतिष्ठान , टाकळघाट, ता. हिंगणा, जि.नागपूर या तीर्थक्षेत्राच्या विकासाचा आराखडा शासन मान्यतेसाठी सादर केला आहे . ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरीता रु.२.०० ते २५.०० कोटीपर्यंत अनुदान (२५१५२५२१) या योजनांतर्गत सदर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी रु. ५.०० कोटी इतक्या रकमेच्या पुरवणी मागणी सन २०१८-१९ मध्ये मंजूर झाली होती.

२. नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का-१४४४, दिनांक ४ जून २०१५ अन्वये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने दि . २१ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या बैठकीत सदर तीर्थक्षेत्राच्या आराखड्यास मा . उच्चाधिकार समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून तत्वतः मान्यता दिली होती. सबब, मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने दि. १७ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत सदर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या रु. ४४२.६८ लक्ष इतक्या रक्कमेच्या कामांना मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर आराखडयातील रु. ४४२.६८ लक्ष एवढया अंदाजपत्रकीय किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा नागपूर यांनी सादर केलेल्या संत योगीराज विक्तूबाबा प्रतिष्ठान, टाकळघाट, ता.हिंगणा, जि.नागपूर या तीर्थक्षेत्राच्या आराखडयातील एकूण रु. ४४२.६८ लाख (रुपये चार कोटी बेचाळीस लाख अडुसष्ठ हजार फक्त) इतक्या किंमतीच्या खालील कामांना जिल्हास्तरीय समितीच्या मान्यते अधीन तसेच मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दि. १७ जून, २०१९ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तातील अटी - शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय किंमत (रुपये लाखात)	प्रशासकीय मान्यता (रुपये लाखात)
१	तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी आवारभिंत बांधणे	६३.५८	६३.५८
२	तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी वाहनतळ बांधणे,	४७.३२	४७.३२
३	महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालय व स्नानगृह बांधणे.	२०.००	२०.००
४	तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी संरक्षणभिंत बांधणे	१९९.८८	१९९.८८
५	तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भक्तनिवास बांधणे व पूजा साहित्य स्टॉलचे बांधकाम करणे	८६.९०	८६.९०
६	तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणे.	२५.००	२५.००
	एकूण	४४२.६८	४४२.६८

२. सदर कामांच्या अंदाजपत्रकास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मंजूरी (Technical Sanction) असल्याची व बांधकामासाठी लागणारी आवश्यक जागा शासनाच्या मालकीची व सदर जागा उपलब्ध आहे याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी खात्री करावी . व परिच्छेद १ मधील अटी- शर्तीनुसार पुढील कार्यवाही करावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी सदर अनुदान वरील कामावरच खर्च करावे. सदर अनुदान दिनांक ३१ मार्च, २०२२ पूर्वी खर्च होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

४. सदर प्रशासकीय मंजुरी आदेशात समाविष्ट कामांचे स्वरूप लक्षात घेता, ह्या कामांची एकत्रित किंवा वेगवेगळी निविदा प्रक्रिया काढावी याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद नागपूर यांनी निर्णय घ्यावा . संपूर्ण प्रकल्पाच्या सर्व कामांची एक किंवा जास्त निविदा काढण्यास हरकत नाही . तथापि सदर कामांची निविदा प्रक्रिया राबवितांना अनावश्यक कामांची विभागणी टाळावी.

५.	उपरोक्त संदर्भाधिन क्र. ३ येथील शासन परिपत्रकानुसार ग्रामविकास विभागाने दिनांक १ एप्रिल, २०१८ पासून LRS ही संगणकीय प्रणाली स्वीकारली असून , यापुढे ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेतील कामे पूर्ण करणाऱ्या ठेकेदारांचे प्रदान थेट ग्राम विकास विभाग स्तरावरुन केले जाणार आहे. सबब सदरील कामे पूर्ण झाल्यानंतर संबंधीत स्थानिक प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या ना-हरकत प्रमाणपत्र व उत्कृष्ट काम पूर्तता अहवालाच्या आधारे निधींची देयके केवळ दायित्व नोंद (LRS-Liability Register System) या प्रणालीमार्फत शासनास सादर करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद नागपूर यांची राहील. त्यानंतर सदरची देयके शासनामार्फत संबंधित पुरवठादार / ठेकेदारास अदा केले जातील . सदर निधी आवश्यक बाबींवर खर्च झाला असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा परिषद , नागपूर यांनी शासनास व महालेखापालांस सादर करावे.

६.	मंजूर निधीचा योग्यरितीने विनियोग होण्याच्या व कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी दक्षता घ्यावी. सदर कामांचा त्यांनी वेळोवेळी आढावा घेऊन कामावर देखरेख ठेवावी व कामांचा प्रगती अहवाल व खर्चाची माहिती उपयोगिता प्रमाणपत्रासह विहित मुदतीत सादर करावी.

७.	सदर तीर्थक्षेत्र विकासाचे काम इतर कोणत्याही योजनेतून घेण्यात आलेले नाही याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी खात्री करावी.

८.	सदर कामांना जिल्हा नियोजन विकास समितीकडून निधी देण्यात आलेला नाही याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी खात्री करावी.

९.	विकास कामे पूर्ण झाल्यानंतर सदरहू काम तीर्थक्षेत्र विकास योजनेतून घेण्यात आल्याचा नामफलक कामाच्या ठिकाणी ठळकपणे दिसेल असा लावण्यात यावा.

१०.	सदर कामांच्या अंदाजपत्रकांना सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता असल्याची खात्री करावी. तसेच सदर कामांची देखभाल दुरुस्ती देवस्थान ट्रस्ट /जिल्हापरिषद/ग्रामपंचायत यांनी करावी. त्याचप्रमाणे सांडपाणी ,घनकचरा व इतर कचरा इ. बाबतची कोणतीही अस्वच्छता होणार नाही, याबाबत संस्थानने व सर्व संबंधितानी विशेष दक्षता घ्यावी.

११.	या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी मागणी क्र. मागणी क्रमांक एल-३-२५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम-१९६-जिल्हा परिषद/ जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य (००) (०७) ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरीता अनुदान (रु.२ कोटी ते रु.२५ कोटीपर्यंत) (२५१५२५२१)-३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) (दत्तमत) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सदर लेखाशीर्षाखाली उपलब्ध असलेल्या सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा. कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, तसेच कामे उत्कृष्ट दर्जाची होतील याबाबत सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी , याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी विशेष काळजी घ्यावी . अन्यथा संबंधितांकडून वसूलीसह कारवाई शासन स्तरावरून केली जाईल .

१२. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांचे लक्ष या विभागाच्या शासन निर्णय दि .१६.११.२०१२ कडे वेधण्यात येत असून पशू हत्या व अंधश्रध्दा वाढीला प्रोत्साहन देणाऱ्या तीर्थक्षेत्रांना निधी वितरीत केला जाणार नाही. सबब संबंधित

तीर्थक्षेत्रस्थानी असे प्रकार शासनाच्या निदर्शनास आल्यास योग्य ती कार्यवाही केली जाईल व शासकीय अनुदान थांबविले जाईल.

१३. सदर वितरण सुधारित मासिक विवरणपत्राच्या मर्यादेत आहे.

१४. सदर निधी वितरीत करतांना वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ.- २, दि. १ एप्रिल, २०१९ च्या परिपत्रकामधील अटी व शर्तींचे पालन करण्यात आले आहे.

१५. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ.- २, दि. १ एप्रिल, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

१६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०५१६५७००४३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANOJ DATTATARY JADHAV

Digitally signed by MANOJ DATTATARY JADHAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a83fc829949e9b1a022b031436c946028b48d51f5a1bf36ca3ce4fead857da72, postalCode=400001, street=BHANDHKAM BHAVAN,25 MARZBAN PATH,FORT,MUMBAI, serialNumber=2766afda86350272237dcf9a191545970f7f12e66d0605c664ca2bf0f3001dc0, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MANOJ DATTATARY JADHAV
Date: 2019.07.16 12:35:31 +05'30'

(मनोज जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
२. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
३. विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर
४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
६. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद , नागपूर
७. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
९. नियोजन विभाग (का.१४७४/१४४४) मंत्रालय, मुंबई-३२.
१०. वित्त विभाग (व्यय -१५, अर्थसंकल्प-१६/१७), मंत्रालय, मुंबई ३२.
११. कक्ष अधिकारी, कार्यासन क्र.वित्त-७, वित्त-१, वित्त-८, ग्राम विकास विभाग
१२. निवड नस्ती (का.यो-६). ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.